## ❖ इम्प्लांट म्हणजे काय :-

शरीराचा एखादा नसलेला अवयव जेव्हा कृत्रिमरीत्या बनवून शरीराच्या आत बसवला जातो आणि असा कृत्रिम अवयव नसलेल्या अवयवाची सर्व कार्ये करतो. तेव्हा अशा प्रकारच्या कृत्रिमरीत्या बसवलेल्या अवयवाला "इम्प्लांट" असे म्हणतात.

दातांचे इम्प्लांट ही देखील गेली साधारण तीस पस्तीस वर्षे प्रचलीत असलेली महत्वाची उपाययोजना आहे. दाताच्या इम्प्लांटमध्ये नसलेल्या दाताच्या जागी टायटॅनियम धातूमध्ये बनविलेला एक छोटा स्क्रू जणू काही ख-या दाताच्या मुळासारखे दाताला हाडाच्या खोबणीत घटट् पकडूण ठेवण्याचे काम करतात. या स्क्रूवरच नंतर सिरॅमिक इतर दुस-या पध्दतीचा दात बसवला जातो. आणि हिरडी व हाडाबाहेर दिसणारा नकली दात या दोन्ही घटकांना इम्प्लांटमध्ये म्हणतात.

## ❖ इम्प्लांटचे दात केव्हा बसवता येत नाही ?

काही शारीरिक तसेच मौखिक आजारात इम्प्लांटचे दात येत नाहीत.

**उदा :- डायबेटीस, रक्ताचा कर्करोग, थायरॉई, ह्यदयविकार**

१. **डायबेटीस** :- खूप बळावलेला व आटोक्याबाहेर असलेला डायबेटीसचा आजार असल्यास शरीराच्या जखमा भरून येण्याची क्षमता कमी झालेली असते. अशा वेळी इम्प्लांटचे दात शरीराकडून नीट स्वीकारले जात नाही. मात्र ज्यांचा डायबेटीस आटोक्यात आहे. जे डायबेटीसची औषधे पथ्ये व्यवस्थित पाळताहेत आणी ज्यांचे मौखिक आरोग्य उत्तम आहे. अशांना इम्प्लांटचे दात यशस्वीरीत्या बसवता यऊ शकतात.

२. **रक्ताचा कर्करोग** :- ज्यांना रक्ताचा कर्करोग ल्युकेमिया झाला आहे अशांनाही इम्प्लांटचे दात केव्हा बसवता येत नाही

Indian Dental Association

३. **थायरॉई पॅराथायरॉईड** :- ज्यांना थायरॉई पॅराथायरॉईड इ. अंतर्ग्रथीचे आजार आहेत. एण्डोकाईन ग्लॅडअशांना इम्प्लांटचे दात बसवता येत नाही.

४. **ह्यदयविकार** :- लिव्हर सि हॉसिस हमॅटिक अर्थ्रायटिस नावाचा संधिवात यांसारखे शरीराचे आजार असतील अशांना इम्प्लांटचे दात बसवीणे खूप अवघड असते.

५. ज्या कर्करोगाच्या रूग्णांना केमोथेरपी वा रेडीएशनची उपाययोजना चालू आहे अशांना इम्प्लांटचे दात बसवता येत नाही.

## ❖ इम्प्लांटच्या दातांची रचना :-

जेव्हा खालच्या किंवा वरच्या जबडयाच्या हिरडीच्या आतील हाडामध्ये टायटॅनियम धातूमध्ये बनविलेल्या छोटया स्क्रूचे रोपण करूण हिरडीबाहेरील टयटॅनियम स्क्रू च्या बाहय भागावर सिरॅमिकचा दात सुपरस्ट्रक्चर बनविला जातो तेव्हा अशा कृमिम दाताला इम्प्लांटचा दात असे म्हाणतात.

## ❖ इम्प्लांटच्या दातांची गुण :-

१. इम्प्लांटचे दात भक्कम असतात.

२. तोडांमध्ये ख-या दाताएवढीच जागा ते व्यापतात.

३ . काढता - घालता येणा-या कृत्रिम कवळयांसारखी प्लेटी व हूक्सची इम्प्लांटच्या दातांना गरज नसते .
४ . इम्प्लांटचा दात हा हाडामध्ये खोचलेला असळयामुळे त्याला आधारासाठी काउन ब्रिजच्या फिक्स दातांप्रमाणे शेजारच्या दोन नैसर्गिक दातांना घासण्याची गरज भासत नसते .
५ . इम्प्लांटच्या दाताची ही ठळक वैशिष्टये आहेत .

❖ **इम्प्लांटच्या दातांचा खर्च** ः-

१ . इम्प्लांटच्या दातांना येणारा खर्चही खूप असतो . आज तरी भारतात सर्वसाधारणपणे इम्प्लांटचा एक दात बनविण्यासाठी दहा ते चाळीस हजार रूपयांपर्यत खर्च येतो .हा खर्च येण्यामागे टायटॅनियमचा इम्प्लांटचा स्क्रू त्याच्यावर बसणारा टायटॅनियमचा बाहय भाग सुपरस्ट्रक्चर आणी या बाहय भागवर तयार करावा लागणारा सिरॅमिकचा दात या सर्व घटकांचा समावेश आहे ही सर्व मटेरियल्स निश्चितपणे आणी निर्विवादपणे विदेशीच इम्पोर्तेड असतात . आज जगभर विविध देशातून सुमारे दीडशे कंपण्या इम्प्लांटच्या दातांना लागणारी मटेरियल्य बनवतात .एवढी चुरस असुनही केवळ विदेशीपणा मुळेच इम्प्लांटच्या दातांचा मूलभूत खर्चच खुप अधिक असतो . शिवाय इम्प्लांटचे दात बसविण्यासाठी करावी लागनारी शस्त्रक्रिया अद्ययावत डेंटल लॅबोरेटरीतून घडवून आणावा लागनारा सिरामिकच दार अनेक निष्णार तंत्रज्ञ व डॉक्टरांचा सहभाग यामुळे देखील इम्प्लांटचे दात बसविण्यासाठी जास्त खर्च येतो .शिवाय इम्प्लांटच दात बनविण्यासाठी जे खास शिक्षण घ्यावे लागते . त्यशिक्षणाचा आणी इम्प्लांटचे दात बनविण्यासाठी लागणा —या खास यंत्राचा आयुधांचा खर्चही खूप जास्त असतो .
२ . इम्प्लंटचे दात बसविण्याची कृती ही खूपच गुंतागुतीची व अवघड नितांत कौशल्याची आहे .

Indian Dental Association